# The Baptist Tabernacle of Los Angeles

Mailing Address:
P. O. Box 15308
Los Angeles, CA 90015
Phone: (213) 744-9999
E-mail: rlhymersjr@sbcglobal.net
www.sermonsfortheworld.com
www.baptisttabernacle.com




Jack Ngann
Pastor

Dr. R. L. Hymers, Jr.
Pastor Emeritus

डिसेंबर, 2022

प्रिय मित्रहो,

मी देवाद्वारे आशिर्वादित झालेला मनुष्य आहे. मला माझ्या लेकरांचा अभिमान आहे. वेस्ली अरिझोना येथे राहते व ती तिची नोकरी व चर्चमधील सेवा व्यवस्थित करते आहे. तिचे पहिले पुस्तक पुढच्या वर्षी प्रकाशित होईल! लेस्ली हा एक यशश्वी उद्योजक आहे व तो त्याची पत्नी जीन त्यांची लेकरं हन्ना, सारा, व रॉबर्ट IV यांच्या सोबत ला कॅनडा-फ्लिंट्रीज मध्ये सुंदर घरात रहातात, जे इलिना व माझ्यापासून लांब नाही. ह्या वसंत ऋतूत आम्ही रॉबर्ट IV चा पहिल्या वाढदिवसाच्या मेजवानीला गेलो होतो. तो आता 1 1/2 वर्षांचा आहे. माझी खात्री आहे की त्याचे पुढील जीवन चांगले आहे!

ऑगष्ट मध्ये आमचे संपूर्ण कुटुंब मरीन कौंटी, दक्षिण सॅनफ्रान्सिस्कोला, ओपन डोअर चर्चच्या 50 व्या वर्धापनासाठी गेलो होतो, मी हे चर्च 1972 मध्ये माझे मित्र माईक रिले व रॉजर हॉपमॅन यांच्याबरोबर स्थापन केले. त्यांना पुन्हा पाहणे छान होते, आणि माझे जुने मित्र मार्क बक्ली व केंट फिलपॉट, आणि इतर पुष्कळ जे त्या महान समयी आमच्याबरोबर होते. माईक रिले यांचा मुलगा सध्या ह्या चर्चचा पाळक आहे. ह्या सेवेच्याद्वारे संपूर्ण जगभरात चाळीसहून अधिक चर्च उभारल्या आहेत. ख-या अर्थाने देवाचे फळ हे विपुल असे आहे !

ज्यावेळी आम्ही सॅन गॅब्रीएल येथील इमारतीत भेटू शकतो तेव्हां अधिकच जवळ येऊ. काम जवळजवळ संपले आहे, आणि आम्ही आवश्यक परवाने मिळविण्यासाठी शहर व देशाबरोबर काम करीत आहे. चीनी लोकांसाठी चर्च उभारणे हे आमचे ध्येय असेल, जसे की देवाने मला खूप पूर्वी त्यासाठी पाचारण केले होते. ते अशा भागात जेथे मोठ्या प्रमाणात चीनी लोक आहे आणि नाव आहे "द चायनीज बॅप्टिस्ट टॅबरनिकल ऑफ ग्रेटर लॉस एंजिल्स. " यापूर्वीच आमच्याबरोबर चीन मधील लोक चर्चला येतात. जॅक नगान, आमचे नवीन पाळक निर्भिडपणे सुवार्ता प्रचार करतायत. तो प्रत्येक रविवारच्या उपासनेनंतर डॉ. ख्रिस्टोफर कागेन यांच्याबरोबर हरविलेल्या लोकांना ख्रिस्तावर विश्वास ठेवावा म्हणून समुपदेशन करतात.

सप्टेंबर मध्ये इलेनाचे वडिल, राफेल सेलर आपल्या मुलगा जॉर्जबरोबर, आम्हांला पाहण्यासाठी गॉटेमालाहून आले. राफेल हे एक चांगला माणूस आहे. ते आता 92 वर्षांचे आहेत तरीहि ते शरीर व मनाने उर्जावान आहेत. ते माझे सासरे आहेत याचा मला अभिमान आहे. त्यांनी आपली नातवंडे, लेस्ली व वेस्ली यांच्याबरोबर जाऊन डॉजर्स बेसबॉल पाहण्याचा आनंद घेतला. एके दिवशी आम्ही त्यांना सॅन्टा मोनिका पिअर घेऊन गेलो व आम्ही एकत्र चांगला वेळ घालवला!

मला माझ्या दोन विशेष मित्रांविषयी सांगावयाचे आहे. एक डॉ. डेव्हिड स्टेम आहेत. ऑक्टोबर मध्ये ते येरुशलेम येथून वयाच्या 86 व्या वर्षी स्वर्गवासी झाले. त्यांनी व त्यांची पत्नी मार्था यांनी आमच्या मधुचंद्राच्या इस्त्राएल व मध्य आशियाच्या प्रवासाचा खर्च औदार्याने केला. आम्ही त्यांच्या घरी राहिलो. डेव्हिड हे मसिही यहुवादाचे एक संस्थापका पैकी होते. त्यांचे सर्वात मोठे कार्य, "संपूर्ण यहूदी पवित्रशास्त्र" ही एक ख्रिस्तीत्वाची यहूदी मूळवादाची मजबूत साक्ष आहे. येशू हा खचित यहूदी तसेच परराष्ट्रीयांसाठी आहे, हे दर्शविते आणि सदैव दर्शवित राहणार.

माझे दुसरे खास मित्र आहेत डॉ. बिल हॅथवे, जे पुष्कळ वर्षे जपानमध्ये मिशनरी आहेत. त्यांना देवाने सुवार्ता-प्रचारक म्हणून पाचारण केले आहे. ते जरी 92 वर्षे वयाचे, कॅन्सर व –हदय विकार असला तरी ते अजून अमेरिकी व जपानी लोकांना सुवार्ता सांगतात. तो माणूस हार मानीत नाही! बिल यांचा मी आदर करतो व त्यांच्यावर खूप प्रेम करतो.


संपूर्ण जगामध्ये माझी पत्नी इलिना ही जास्त प्रेमळ व काळजी करणारी आहे. माझ्या पेक्षा लोक तिची जास्त चौकशी करतात. आमचा 40 वा वर्धापन दिन 27 सप्टेंबरला होता. 25 ला आमच्या चर्चने व आमचा मुलगा रॉबर्ट लेस्ली III ने बरबॅन्क येथील कॅस्टावे रेस्टॉरंट मध्ये आमच्यासाठी जंगी पार्टी ठेवली होती. चर्चच्या लोकांनी व्हिडीओवरुन साक्षी दिल्या. माझी मुले जॉन वेस्ली व रॉबर्ट लेस्ली व्यक्तीशाः बोलले, तसेच आमचे नवीन पाळक, जॅक नागेन ही बोलले. चीनी चर्च मधून माझे जुने मित्र डॉ. जॅकसन लाऊ व माझे हायस्कूलचे मित्र क्लेअर बायबी. किती छान वेळ आमचा गेला!

गेल्या वर्षी मला मेंदूचा झटका येऊन गेला. परंतू मला जमेस धरु नये ! काही काळ मी जवळपास राहण्याचा विचार करतो. माझ्या डॉक्टरानी एकदा सांगितले, "तुम्हांला तुमच्या आजाराचा जास्त त्रास होणार नाही." काही वर्षापूर्वी, मी प्रार्थना केली की मी आमच्या 50 व्या वर्धापन दिनापर्यंत जगावे, येथून पुढे दहा वर्षे. देवाची मर्जी असेल, माझी आशा आहे मी तेथे असेल!

मी प्रार्थना करतो की आणखी एक संजीवन मी पहावे. माझे आवडते स्तोत्र सांगते, "ह्या जिवंताच्या भूमीवर परमेश्वर माझे खात्रीने कल्याण करील " (स्तोत्र 27:13). मी परमेश्वराचा चांगुलपणा – चीनी चर्च मध्ये – संजीवन, आणि पुन्हा येशूच्या चळवळीमध्ये पाहिला. मी प्रार्थना करतो की आमच्या चर्च मध्ये, मी आणखी एकदा संजीवन पहावे!

***आपण आमचे शेकडो वचना-करिता-वचन उपदेश व पाठ शेहचाळीस भाषा मधून***
***WWW.SERMONSFORTHEWORLD.COM वर वाचू शकता.***

या नाताळ समयी प्रार्थना करतो की, “परमेश्वरा हे असेच होऊ दे.” आणि त्याच्या पुत्राचा जन्म व्हावा, आपल्यासाठी त्याने मरण सोसावे म्हणून त्याला पाठविल्याचे देवाचे अवर्णनीय दान (II करिंथ. 9:15) साजरे करताना तुम्हासाठी हा अद्भूत काळ असावा अशी आशा करतो!



येथे मी 50 व्या वर्धापनाच्या निमित्ताने ओपन डोअर चर्च जमलो असताना विजयाचे चिन्ह V- दर्शविताना!



माझे जुने मित्र माईक रिले (माझ्या उजव्या बाजूला) आणि स्टिव्ह व नॅन्सी क्रॉस, चर्चचे दिर्घकाळ सदस्य यांच्याबरोबर माझे कुटुंब व मी एकत्र जमलो असतांना.


तुमचा येशूच्या नावात,



रेव्ह. आर. एल. हायमर्स, ज्युनि.
डी. मिन., डी.रेल., लिट.डी.
फिलिप्पै. 4:13



रॉबर्ट IV चा पहिला वाढदिवस. डावीकडून उजवीकडेः जीनचे बाबा मि. किम, कोरियाच्या पारंपारिक वेशात जीन, सारा, रॉबर्ट III ला घेऊन रॉबर्ट IV, हास्य करीत मी, इलिना, सारा, वेस्ली, आणि इलिनाची आई लिन्डा.



माझ्या नातवंडाना मीठीत घ्यायला मला आवडते, सारा, रॉबर्ट व हन्ना!



40 व्या वर्धापना दिनी जॅकसन लाऊ यांच्या बरोबर इलिना व मी.



पुढे: हन्ना व सारा बरोबर रॉबर्ट III, रॉबर्ट IV ला घेऊन इलिना, आणि मी. पाठीमागेः लिन्डा, जीन, राफेल व जॉर्ज सेल्युलर, इलिनाचा भाऊ आयर्विन सेल्युलर.



रॉबर्ट IV व माझ्या बरोबर आमची जुळी मुले जॉन वेस्ली व रॉबर्ट लेस्ली त्यांच्या वाढदिवशी



आमच्या 25 व्या वर्धापनाच्या चित्राच्या पुढे 40 व्या वर्धापन दिन प्रसंगी इलिना आणि मी.

***आपण आमचे शेकडो वचना-करिता-वचन उपदेश व पाठ शेहचाळीस भाषा मधून***
***WWW.SERMONSFORTHEWORLD.COM वर वाचू शकता.***